महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : collectorpalghar@gmail.com

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/प्रतीबंधात्मकआदेश/कावि-३६५ /२०        दि.३१/०३/२०२०

**वाचले**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ व ५१ (b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
५) मा.सचिव (गृह), गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना क्र.४०-३/२०२०-डीएम-आय (ए) दि.२४/०३/२०२०.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/२०२०/CR.९२/DisM-१/दि. २३.०३.२०२०, दि.२४.३.२०२० व दि.२५.३.२०२०

---

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**आदेश**

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृहे, म्युझियम, सर्व शॉपिंग मॉलमधील सर्व दुकाने व आस्थापना, अंगणवाडी, शाळा, महाविद्यालये इत्यादि शैक्षणिक संस्था इत्यादि दि.१३/०३/२०२० पासून दि.३१/०३/२०२० पर्यंत साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याव्दारे सुचित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम व उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून निर्गमित केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित केले आहेत.

१) पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व शॉपिंग मॉलमधील सर्व दुकाने व आस्थापना (अत्यावश्यक, जीवनावश्यक व औषधालय वगळून) दि.१४/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० या कालावधीत बंद ठेवणेकामी